# मृण्मयी

(मिश्र कवितासंग्रह - भाग २)

रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)

मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**मृण्मयी** (मिश्र कवितासंग्रह - भाग २)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : drmangushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२,
कवितांच्या बागेसमोर, ज्योतीनगर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस,
वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : ज्येष्ठ शु. १३, शके १९४७
सोमवार, दि. ०९ जून, २०२५

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, १-एन, सेक्टर ए, एन-१,
सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-987974-8-3

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : **₹ १५०/-**

सर्व रसिकवरांना
सादर समर्पण...

# मनोगत

'मृण्मयी' या शब्दातच माझं मन गुंतलेलं आहे. माझ्या या संग्रहाचं नाव ठेवताना मला असं वाटलं की, हेच नाव माझ्या लेखनाच्या मूळस्वभावाला सर्वाधिक शोभून दिसतं. माझ्या प्रत्येक कवितेचं मूळ मातीमध्ये आहे. त्या मातीमध्ये जी धरणी आहे, आई आहे, आणि अस्तित्व आहे. कविता माझ्यासाठी केवळ अभिव्यक्ती नाही; ती माझ्या जगण्याची साक्ष आहे. ज्या क्षणी शब्दात भावना उतरते, त्या क्षणी मी जगते.

'मृण्मयी' मधील प्रत्येक कविता अशीच जन्मली, एखाद्या ओलसर क्षणातून, एखाद्या वेदनेतून किंवा कधी फक्त एका शांत नजरेतून. मला नेहमी असं वाटतं की प्रत्येक माणूस मातीपासून बनलेला असतो. त्याच्या स्वप्नांचाही रंग मातीचाच असतो तपकिरी, उबदार, जिवंत. म्हणून माझ्या कवितांमध्ये माती केवळ प्रतिमा नाही; ती एक तत्त्व आहे जी मला जिवंत ठेवते, आणि मला जाणवतं की, 'मी पृथ्वीचा तुकडा आहे.'

या संग्रहात विषय विविध आहेत. कधी मी स्त्रीमनाबद्दल बोलले आहे, कधी समाजाविषयी, कधी माणसाच्या आतल्या रिकामेपणाविषयी. पण या सगळ्यांच्या पायाशी एकच तत्त्व आहे मृण्मयीपणाचं. कारण माती माणसाला बांधते, पण ती त्याला मुक्तही करते. माझ्या लेखनासाठी मला High Range Book of World Records मध्ये मान्यता मिळाली. ही माझ्यासाठी केवळ अभिमानाची नव्हे, तर जबाबदारीचीही गोष्ट आहे. ही नोंद मला सतत सांगते 'तुझं लेखन केवळ तुझं नाही, ते तुझ्या भाषेचं, तुझ्या संस्कृतीचं, आणि तुझ्या वाचकांचं आहे.'

'मृण्मयी' लिहिताना मी अनेकदा स्वतःशी संवाद साधला. काही कविता मला स्वतःहून मिळाल्या; काही मी मनातल्या मातीवर कोरल्या; काही कवितांनी माझं मन भिजवलं. त्या सर्व कवितांनी मला आतून अधिक स्थिर केलं, अधिक कोमलही! माझ्या लेखनाची सुरुवात कधीही ठरवून होत नाही, मला कधीही प्रश्न पडत नाही की, 'ही भावना मी कशी सांगेन?' परंतु माझ्या भावना इतक्या सरसर भावभरून येतात की मग शब्द आपोआप वाहू लागतात. मला वाटतं, कविता

म्हणजे अनुभवाची माती आणि भावनेचं पाणी. जेव्हा दोन्ही एकत्र येतात, तेव्हा सृजनाची मृण्मयी मूर्ती तयार होते.

'मृण्मयी' हा माझ्या अंतर्मनाचा शिल्पसंग्रह आहे. यातील प्रत्येक कविता माझ्या आत्म्याचा एक तुकडा आहे. त्या काहीवेळा नाजूक आहेत, काहीवेळा प्रखर, पण सगळ्याच खऱ्या आहेत. मला हे जाणवतं की वाचक या कवितांना वाचताना स्वतःचं प्रतिबिंब त्यात पाहतील. माती सगळ्यांची सारखीच असते, पण प्रत्येकाच्या पावलांचा ठसा वेगळा.

'मृण्मयी' हे त्याच पावलांचं दर्शन आहे, माझ्या मनाच्या वाटेवर उमटलेल्या ठशांचं. या संग्रहात मी माणसाच्या भावनांना मातीसारखं रूप दिलं आहे कारण मातीसारखंच मनही आहे. भिजतं, कोरडं होतं, तुटतं, पण पुन्हा आकार घेतं आणि हाच पुनर्जन्म कवितेचा असतो.

'मृण्मयी' माझ्या लेखनाचं सार आहे, भौतिकतेच्या पलीकडे जाऊन आत्म्याशी जोडणारं. या कवितांनी मला शिकवलं की सृजन म्हणजे आपल्यातली माती ओळखणं. या कवितांचा प्रत्येक शब्द वाचकाला स्पर्श करेल, जणू ओल्या मातीतलं उबदारपण, ज्याने आपण पुन्हा आपल्यातलं मानवत्त्व ओळखू. ही माझ्या मनातील ओंजळभर माती आहे तुमच्यासाठी, तुमच्या अंतःकरणातल्या मृण्मयीला अर्पण केलेली.

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# प्रस्तावना

माती म्हणजे केवळ पृथ्वीचा घटक नाही; ती माणसाच्या अस्तित्वाचं प्रतीक आहे. तिच्यात जीवनाचं बीज दडलं आहे, आणि तिच्या शांततेत सृजनाचं रहस्य. 'मृण्मयी' हा संग्रह त्या मातीसारखाच आहे शांत, पण सर्जनशील; साधा, पण खोल; नाजूक, पण समर्थ.

डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्या लेखनात नेहमीच एक गूढ सौंदर्य असतं. त्यांच्या शब्दांतून माणसाच्या भावनांचं, नात्यांचं आणि जीवनाच्या प्रत्येक सूक्ष्म अनुभूतीचं दर्शन घडतं. त्यांचा प्रत्येक कवितासंग्रह कविता माझी, गंधराणी, अबोली, कवडसा हा त्यांच्या काव्यप्रवासातील एक वेगळा टप्पा ठरला आहे.

'मृण्मयी' मात्र या सगळ्यांचा संगमबिंदू वाटतो कारण यात त्या माणसाच्या भावविश्वाला, पृथ्वीच्या मृदूपणाला आणि काळाच्या गूढतेला एकत्र आणतात. 'मृण्मयी' म्हणजे मातीची बनलेली, पण भावनांनी जिवंत झालेली. या संग्रहातील कविता मातीच्या या तत्त्वाशी निगडीत आहेत. कधी त्या मातीतल्या ओलाव्यासारख्या मृदू आहेत, कधी त्या तिच्या सुगंधासारख्या आठवणीत राहतात, तर कधी त्या तिच्या धरणीपणासारख्या स्थिर आणि तत्त्वदर्शी. डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्या लेखनाची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्यांची संवेदनशील निरीक्षणशक्ती. त्या ज्या गोष्टींकडे पाहतात, त्या केवळ दृश्य राहत नाहीत, त्या अनुभूती बनतात. त्यांच्या शब्दांनी साधं दृश्यही अर्थपूर्ण होतं.

'मृण्मयी' मधील प्रत्येक कविता म्हणजे त्या अनुभवलेल्या क्षणाचं एक शिल्प आहे मातीच्या हातांनी घडवलेलं, पण आत्म्याच्या श्वासांनी जिवंत झालेलं. या संग्रहातील कविता मिश्र आहेत. नातं, निसर्ग, काळ, प्रेम, स्त्रीमन, समाज, ओळख, आत्मसंवाद सगळं आहे यात. पण प्रत्येक विषयाला स्पर्श करताना कवयित्री त्या विषयाला मानवी मातीचा गंध देते. ती शब्दांच्या

अलंकारात अडकत नाही; ती अनुभवाच्या मातीवर कविता घडवते. म्हणूनच प्रत्येक कविता वाचकाच्या मनात एक नवीन अर्थ उमलवते.

'मृण्मयी' वाचताना असं वाटतं, जणू मातीच्या ओंजळीतून आपण स्वतःकडे पाहत आहोत. प्रत्येक ओळ आपल्याला जमिनीशी जोडते त्या स्थैर्याशी, त्या शांतीशी, आणि त्या सहनशीलतेशी, जी जीवनात राहणं शिकवते. कवयित्रीच्या लेखणीत 'माती' हा केवळ प्रतीक नाही; ती तिची आत्मा आहे. कवयित्रीचा भाव जाणवतो की, स्पर्श जरी अनेकांचे झाले तरी सुगंध मात्र स्वतःचा राहावा. ही ओळ तिच्या लेखनाची भूमिका सांगते. तिच्या कवितांमध्ये आत्मसन्मान आहे, आत्मीयता आहे, आणि आत्मभानही आहे.

'मृण्मयी' म्हणजे कवयित्रीचं जीवनदर्शन, ज्यात माणूस आणि निसर्ग, संवेदना आणि विचार, स्त्री आणि पृथ्वी हे सगळं एकरूप झालं आहे. या संग्रहात ती माणसाच्या भावनांचा शोध घेते, पण त्यातून ती स्वतःचा शोधही घेते. डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्या काव्यलेखनाचा गौरव High Range Book of World Records मध्ये झाला आहे. हा केवळ गौरव नाही, तर मराठी कवितेचा सन्मान आहे.

'मृण्मयी' सारख्या संग्रहांनी त्यांनी सिद्ध केलं आहे की त्यांची लेखणी केवळ शब्दांनी नव्हे, तर आत्म्याने लिहिते. या संग्रहातील कवितांमध्ये एक विलक्षण संतुलन आहे, ती न अतिशय भावुक आहे, न कोरडी तत्त्वज्ञानात्मक. ती मधल्या वाटेवर चालते, जिथे हृदय आणि बुद्धी, अनुभव आणि अभिव्यक्ती, दोन्ही भेटतात. हीच 'मृण्मयी'ची ताकद आहे.

वाचकासाठी हा संग्रह म्हणजे स्वतःकडे परत जाण्याचा प्रवास आहे. प्रत्येक कविता जणू सांगते 'तू मातीचा आहेस, पण मातीसारखा अमर आहेस.' या कवितांचा आवाज मृदू आहे, पण अर्थ खोल. तो आपल्याला जगण्याच्या साधेपणाचं आणि सौंदर्याचं भान देतो. 'मृण्मयी' म्हणजे मानवी जीवनाच्या मातीला दिलेलं कवितांचं रूप एक ओंजळ भरून शब्द, पण भावनांचं अथांग आकाश.

**श्री. शशिकांत कुलकर्णी**
निवृत्त न्यायाधीश, मुंबई
सध्या छत्रपती संभाजीनगर

# अनुक्रमणिका


१) घरट्याची ओढ आहे ... ११
२) शब्दात कृष्णराधा ... १२
३) स्त्री ही अतुल्य आहे ... १३
४) आत जे आहे सुंदर काही... १४
५) रंग संग मग दंग दंग ... १५
६) श्वासासवे संगती तूच येते... १६
७) अशी चैतन्ये पसरून जाती... १७
८) प्रिये अनुरागिनी ... १८
९) रंग गोड हा काळा ... १९
१०) खुले हृदयकळी ... २०
११) पंखाचा स्पर्शकिनारा ... २१
१२) रंग कोणते मज मनी ... २२
१३) नको घाबरू तू ... २३
१४) असा अनोखा जगू
या ग्रीष्म हा ... २४
१५) दे तनु मज पुष्पवल्ली ... २५
१६) एक कविता जन्मते ... २६
१७) जपून ठेवीन
स्मृती होळीच्या ... २८
१८) ऋतू भावनांचे येती ... २९
१९) वसंत बहरला ... ३०
२०) रंग अनोखे जपणे की ... ३१
२१) वासंतिक राग ... ३२
२२) एक अनामिक भीती ... ३३
२३) म्हणून ही सुरंगी
सखी वाटते ग ... ३४
२४) झाड अंगणात माझ्या
रंग रंग रंग झाले ... ३५
२५) घरीदारी मनी मनी ... ३६
२६) स्वस्तिक ... ३७
२७) काटे जागोजाग ... ३८
२८) आता कठीण ... ३९
२९) बोल प्रीतीचे ... ४०
३०) ती आणि मोगरी ... ४१
३१) चुडा जपला मनी मी ... ४२
३२) रेश्माचं पाणी पाणी ... ४३
३३) ये ग ये रखुमा राणी ... ४४
३४) उभारू गुढी नव्या दमाची... ४५
३५) बळ तू देशील तर ... ४६
३६) ओठ शिवले ... ४७
३७) मन हिरव्या क्षणांचे ... ४८
३८) रोज नव्याने जन्मा यावे ... ४९
३९) अले किती गोड तू ... ५०
४०) तुझी कारागिरी गोड ... ५१
४१) ऐक ऐक तू बकुळी ... ५२
४२) प्राण येती तरारून ... ५३
४३) जय जय श्रीराम ... ५४
४४) मना हरवले आहे ... ५५
४५) अरे बोक्या दादा ... ५६
४६) ते बालपण शाबूत राहावं... ५७
४७) क्षणी सुवास सुखाचा ... ५८
४८) नीलवसने नयनमधुरे... ... ५९
४९) आई आईच असते ... ६०
५०) आई नावाचं
पुस्तक असलं ... ६१
५१) तप्त झळा मातल्या ... ६२
५२) मायंदळ मायंदळ
देऊन जा ... ६३

| | | |
|---|---|---|
| ५३) एकदा येऊन जा | ... | ६४ |
| ५४) सांग रे माझ्या मना | ... | ६५ |
| ५५) या अबोलीसारखी मी | ... | ६६ |
| ५६) तेज दीप उजळले | ... | ६७ |
| ५७) निजानंदाचे कमळ | ... | ६८ |
| ५८) झुंजूमुंजु गावामंदी | ... | ६९ |
| ५९) कोरं पान | ... | ७० |
| ६०) बोकुला छकुला | ... | ७१ |
| ६१) अग अग हरणुली | ... | ७२ |
| ६२) चंद्रम्या तू सांग ना | ... | ७३ |
| ६३) हृदय हे रंगून जाते | ... | ७४ |
| ६४) जन्म न वाया जावो माणसा | ... | ७५ |
| ६५) काय दिवस होते भारावलेले | ... | ७६ |
| ६६) नवीन प्राण हे फुंकावे | ... | ७७ |
| ६७) अक्षय माझे कर्म ठरू दे | ... | ७८ |
| ६८) पाठवली तू हळवी बकुळी | ... | ७९ |
| ६९) अस्तित्वाचं असणं | ... | ८० |
| ७०) वेळा चुकल्या ऋतूंच्या | ... | ८१ |



## (१)
## घरट्याची ओढ आहे

डोळ्यात वाच माझ्या
नजरेतली करारी
घेतो भरून सहजी
पंखातली भरारी


जगण्यातली मजा जी
जगतो मनास भरुनी
उडतो खुलास उंच
आनंद पंख करुनी

चोचीत दाणा पाणी
तो घालतो सुखाने
गातो सुरेल गाणे
मी गोडव्या मुखाने

बसतो निवांत कधीही
डहाळी झुला झुलुनी
रंगात पंख माझे
जाती उगा भुलुनी

नसती मनात चिंता
घरट्याची ओढ आहे
येताच सांजवेळ
परतून जाय पाहे

दि.०५/०३/२०२४
सकाळी ०७.३९ वा.



## (२)
## शब्दात कृष्णराधा

ही कसली प्रीत राधे
मजला कधी न कळते
का धावतो तुझ्याशी
कधीही न आकळते

दोघात ना कधीही
शब्दांची बंधने ही
असतात नित्य भरली
प्रेमाची स्पंदने ही

उघडून लोचनांना
राधा दिसे दिसे ना
मिटताच नेत्रकमळे
ती लाडकी हसे ना

स्पर्शात जन्म सारे
सामावले कसे हे
आदी न अंत जरी मी
तू मध्य हे कसे गे

तू देह नाही केवळ
तू प्रेम मूर्त माझी
ओतून आत्मरस गे
प्रीत उत्स्फूर्त माझी

उलटून जाऊ दे ना
कित्येक त्या युगांना
हा श्याम राधेचाच
उमजेल भावनांना

शब्दात कृष्णराधा
अर्थात प्रेम बाधा
भावात भाव शोभे
अनुरागी राग साधा

दि.०७/०३/२०२४
सकाळी ०७.२३ वा.



## (३)
## स्त्री ही अतुल्य आहे

आजचा दिवस माझा ऐसे
किती बोलले सारे
रोजचा दिवस मला सारखा
तेच आकाश तारे

देत शुभेच्छा जग म्हणाले
स्त्री ही अतुल्य आहे
तिचा त्याग विश्वास ध्यास हा
सदैव अमूल्य आहे

कुणी म्हणाले नका करू हो
आज तुम्ही ती कामे
आजचा दिवस विशेष आहे
सकल स्त्रियांच्य नामें

बरे वाटले क्षणभर इतका
पाहून आदर सारा
वाहत आल्या स्नेहभराच्या
जिकडून तिकडून धारा

एक मोकळा श्वास घेतला
हवा बोलली काही
मीही आहे स्त्रीच प्रिये ग
आपुली सुटका नाही

कितीही असे दिवस असू दे
जन्म चंदनी होतो
प्राजक्ताचा सडा अबोली
रोज अंगणी होतो

दि.०८/०३/२०२४
रात्री ११.५३ वा.



## (४)
## आत जे आहे सुंदर काही

लपून बसला हिरवा चाफा
गंध परी तो लपेल का
आत कोश भरले जे गुणांचे
सांग वेड्या ते छपेल का


जरी वाटले नको दावण्या
उगाच काही जे आतले
सूर्य न लपवे प्रकाश आपुला
बीजांकुरी वृक्ष साठले

आत नदीच्या मधुर जळातून
जीवन वाहे रसरसले
कोण फळातून साखर भरतो
जीवनसत्त्वे घसघसले

मध फुलांच्या परागातले
फूलपाखरा कसे कळले
उंच नभातून कसे उडावे
त्या पक्षांना कसे वळले

आत जे आहे सुंदर काही
प्रत्येका दिधले देवा
मुक्तपणे ते लुटू आनंदे
लपवून त्यासी का ठेवा

दि.०९/०३/२०२४
सकाळी ०८.४१ वा.



## (५)
## रंग संग मग दंग दंग

हरवून जाते रंगांमध्ये
किती तुझी ही उदारी
छटा निराळ्या भाव निराळे
धन्य तुझी कलाकारी

हिरव्या हिरव्या रंगामधला
आल्हादी ताजवा
इथे चमकतो रंगरंगुला
मनी कुणी काजवा

रंग फिके मोहवून जाती
गडद भाळवून देती
कधी अंधाऱ्या रातीसुद्धा
रंग चाळवून जाती

रंग संगती कुठून आणतो
अजब सृजनता त्याची
जो तो पाहतो रंग सुरंगी
ह्यासम रंगळी ह्याची

रंग संग मग दंग दंग
मन रंग खेळते छंद
रंग रंग श्रीरंग अभंग
आत्मरंगी जीव बंद

दि.१०/०३/२०२४
दुपारी ०१.०३ वा.



## (६)
## श्वासासवे संगती तूच येते

अनावर मनाला कसे सावरू ग
प्रिये स्वतःला मी कसे आवरू ग
जे गुंतले मोकळ्या कुंतलात
वाटे हृदयास कधी नावरू ग

मुखी एक आभा मला जी लुभावे
नजर प्रीतभरली सदाची खुणावे
तुला पाहताना मी हरवून जावे
खुशी येत तुजजवळी बघ ना दुणावे

तुझ्या देखण्या चेहऱ्याला पहावे
तुला पाहता काळजाला वहावे
असे वाटते लाभता तू मला गे
तुझ्या सोबतीने सदाची रहावे

तुझ्या कुंडलांची छवी डोलते ना
मुखश्री तुझी काय मज बोलते ना
तुझ्या दृष्टीपाते जे चैतन्य मिळते
तुझे हास्य कोणासवे तोलते ना

तनूशी लिपटली तू सुंदरशी साडी
अन कंचुकीने तिची वाढे गोडी
पदर जो रुळे खांद्यावर टाचलेला
करतो जरा वारा ती गोडी खोडी

मन माझे धीरास सोडून देते
तुझ्याशी पुन्हा ते मला का ग नेते
कधीही तुला मी न विसरेन राणी
श्वासासवे संगती तूच येते

दि.११/०३/२०२४
सकाळी ०९.२४ वा.



**(७)**

## अशी चैतन्ये पसरून जाती

कुणी न पाहती वनी काननी
उमलून आल्या फुला
ते तर झुलती स्वानंदाचा
आनंदाने झुला

हळूच येते झुळूक गारवी
थंड थंड वाहते
वेलीवरूनी कळी कळुली
वाकून मग पाहते

रंग उमलती सारे सुंदर
खुलवून दे परिसरा
त्यातच येतो लाडिक वाहत
अवखळसा का झरा

मधेच उडती गोड गोडुली
नाचरी फुलपाखरे
वाचून घ्यावी पंखांवरती
रंगमोह अक्षरे

अशी चैतन्ये पसरून जाती
क्षणोक्षणी त्या तिथे
दोन फुले मज मनी उमलती
स्वप्नी रमते मी इथे

दि.१४/०३/२०२४
रात्री ११.२० वा.



## (८)
## प्रिये अनुरागिनी

प्रिये, अनुरागिनी,
अनुगामिनी, मानिनी,
कामिनी, त्वमसि
मम हे स्वामिनि ।।

संजातं में जीवनं
सुन्दरम्? अति सुन्दरम्?
आयातासि मधुमास इव
सुखवर्धनम्? प्रियदर्शनं
त्वं हि प्रिया मनमोहिनी ।।१।।

नेत्रकटाक्षे कर्षण शक्ति:
केशकुंतले गुंफणशक्ति:
हास्ये काचीत्? मोहनशक्ति:
कथं न हृदयं समर्पयामि
त्वमसि शशांकस्य रोहिणी ।।२।।

जीवेयं  न च त्वया विना
न चापि प्रीति: त्वया विना
त्वमसि प्रेरणा अभिधारणा
त्वमेव गरिमा मधुरिमा
त्वमसि प्रीतिधारिणी ।।३ ।।

दि.११/०३/२०२४
प्रभाते ११.३७ वादने



## (९)
## रंग गोड हा काळा

रंग काळा काळा
आई, आपुला रंग का ग काळा?
ढवळे पाणी, आकाश पांढरे
हंस स्वच्छ पांढराळा
आपुला रंग का ग काळा?

बदक पांढरे गोरे गोरे
कोंबडा तसा पांढरा हा बगळा
सारसपक्षी किती ढवळे ते
ढवळा कबुतर मेळा
आपुला रंग का ग काळा?

एखादा पोपट दिसे पांढरा
मोरही दिसतो शुभ्र आगळा
पेंग्विन पुढूनी धवल धवल किती
बघ ना पांढरा गायबगळा
आपुला रंग का ग काळा?


काकाकुआ किती गोरा गोरा
करकोचा ना काळा
समुद्रपक्षी सुंदर ढवळे
ढवळा त्यांचा चाळा
आपुला रंग का ग काळा?

ढग पांढरे चंद्र पांढरा
चांदण्या गोऱ्या ढवळ्या
नदी पांढरी जळ हे शुभ्र
फुले पांढरी तशाच ह्या कळ्या
आपुला रंग का ग काळा?
सांग ना, आपुला रंग का ग काळा?

असू दे आई रंग कसाही
पाठीवरती तुझ्या मी बसलो
आई जवळी आहे म्हणुनी
आनंदाने बघ ग हसलो
रंग छान बघ आपुला काळा
नजर न लागे बाळा

आई, रंग गोड हा काळा

दि.१३/०३/२०२४
सकाळी ०८.४३ वा.



## (१०)
## खुले हृदयकळी

चल ना खा:, जरा सरोवरी फिरू
नीऽऽऽलकमळे, तोडू भरभरू
बघ आणले मी एक दाखविण्या
खूप सारे दोघे चल गोळा ग करू

तू ग किती देखणी नाजूका खार
आवडती कमळे तुला फार फार
गालावर फिरवीन मऊ मऊ पाकळ्या
लाजून चूर तू मी बघूनच ठार

कसे तुला रिझवू, रूप तुझे सजवू
मन तुझ्यावर राणी भुललंय जे
आज मग दिसले सरोवर हसले
कमळांच्या ताटव्यांनी खुललंय जे

कशी गोड दिसतेस, डोळ्यातून हसतेस
प्रेम तुझे पाझरते निर्झऱ्यावाणी
गोड तुझा स्वर ग, प्रीतीच घर ग
घायाळ मी पुन्हा पुन्हा तुझ्यावर राणी

भाळलो मी आजही कमळाचा बाजही
अंग तुझं रेशमाची जणु पाकळी
डोळे तुझे लाजरे, मदनाने साजरे
गाली खळी खुले खुले हृदयकळी

दि.१५/०३/२०२४
सकाळी ०६.५४ वा.




## (११)
## पंखाचा स्पर्शकिनारा

हलक्या हलक्या मऊशार
पंखाचा स्पर्शकिनारा
गालावरती सख्या दे फिरवून
अलगद भावपिसारा

रंगमोहिनी मोही पाडते
पुन्हा पुन्हा भुलवुनी
मनमोरणी मनात नाचे
स्वप्नपंख फुलवुनी

क्षण ते सुंदर घे साठवुनी
आठवून सहवासाला
पंख तोच मग असे पुरेसा
गोड मधुर भासाला

नसता जवळी आपण दोघे
पंख जवळी असतो ना
लाडिक साऱ्या खुणा देऊनी
गाली मग हसतो ना

उडतो गिरक्या घेऊन थोडा
झुळूक हवेची येता
रोमरोम उत्फुल्ल तो होतो
अंगी फिरवून देता

दि.१६/०३/२०२४
रात्री ११.५७ वा.



## (१२)
## रंग कोणते मज मनी

कसे तुज कळले चित्रकारा
रंग कोणते मज मनी
पाकळ्यांच्या मल्मलीवर
चालते मी यौवनी

वाटते सारेच आहे
रंगभरले भारले
वृक्षवेली पाने सारी
रंगातून साकारले

त्या तिथे उगवून आल्या
स्वप्नवेड्या कोंबुल्या
रंग अंगोपांगी त्यांच्या
आत आशा थांबल्या

उंच उडती पाखरेही
उतरूनी येती घरा
हरखुनी जाती पुन्हा ती
रंगाळी पाहून जरा

सांगते मी आज तुजला
आत माझ्या रंग काही
लपवुनी ठेवू किती मी
लपविणे मज येत नाही

तू तुझ्या रे कुंचल्याने
कागदावर विश्व रेखून
दावीशी मज रंगभरले
नवनवे आयुष्य आखून

दि.१७/०३/२०२४
रात्री १०.३३ वा.



## (१३)
## नको घाबरू तू

नको घाबरू तू माझ्या मित्रा
आलो बघ मी तुला वाचविण्या
खड्डा छोटा असो की मोठा
मैत्री खरी पुरे मना नाचविण्या

चिंब नाहलो भिजलो मीही
तुही तसाच भिजलेला
डोळ्यामध्ये पाऊस का रे
उगाच मित्रा थिजलेला

चल चल ये ना बाहेर ये तू
हात मी देतो प्रेमाने
देईन तुजला खाऊ बिस्कीट
दूध आवडीचे नेमाने

चमक केवढी डोळ्यामधली
ओढ आपुली ओली रे
दोस्ता राहू सोबत आपण
जरी छोटी माझी खोली रे

पाऊस आता रोजच येईल
भिजशील मित्रा रोजच तू
सर्दी खोकला येईल तुजला
होत आजारी आजच तू

चल चल लवकर अंग पुसू या
आई नाहीतर रागावेल
वाकळ देतो गरम छानशी
माया त्यातून सामावेल

दि.१८/०३/२०२४
सकाळी ०९.२२ वा.



## (१४)
## असा अनोखा जगू या ग्रीष्म हा

सरस तीरावर गुलमोहराची
वाट किती देखणी
टाकत अलगद पाऊल त्यावर
स्वप्नांची रेखणी

लाहीलाही होते उन्हाने
ग्रीष्माची काहिली
तशात येथे तुझी राजसा
स्मृती जळी राहिली

थंडाव्याची रम्य ठिकाणे
सोबतीने चालली
तूही प्रीतीने मज केसांतुन
मोगरी जी माळली

कुठून एवढी उमेद येते
रखरखणाऱ्या उन्हात
जाळतो शोषतो सुकवतो ऋतू जो
तरी पालवी मनात

जळात शीतल सुवास भरले
सुगंध पुष्पातुनी
परिमळणारा वारा वाहतो
रानारानातुनी

नौकाविहारा येई प्रियवरा
तुषार दे उडवुनी
असा अनोखा जगू या ग्रीष्म हा
आठवास घडवुनी

दि.१९/०३/२०२४
रात्री ०७.४१ वा.



## (१५)
## दे तनु मज पुष्पवल्ली

कुसुम आले उमलुनी
रंगात बोलू लागले
पाकळ्यांच्या हिंदोळ्यावर
सुमन डोलू लागले


इवलुसे जगणे की त्याचे
जीव आहे इवलुसा
इवलुशा स्वप्नात रंगे
श्वास त्याचा इवलुसा

केवढा विश्वास त्याच्या
त्या उमलण्यातुन दिसे
राहणे किती काळ न जाणे
तरी परागातुन हसे

सांज होता मिटून घेते
पापण्या अलवार ते
कोश गंधाळून जाती
मस्त मदनी वार ते

रंग किती अन् कोणते
कोणते आकारही
दे तनु मज पुष्पवल्ली
भावफुले साकार ही

दि.२०/०३/२०२४
सायं. ०६.४५ वा.



## (१६)
## एक कविता जन्मते

किती मल्मली मनी जन्मली
तू भाव वसने नेसली
सार सारे जीवनाचे
सांगता स्मित हासली

दुःख येते शब्द लेऊन
आर्तता तुज अंतरी
ज्या खुणा दुखऱ्या पुन्हा
त्या बघ विसावुन तुजवरी

लहर आनंदात लहरे
अन विहरतो मोदही
विरह पेटून जाळताना
तू दिलासा रोजही

प्रीत फुलते हलकी हलकी
हलके मन वाऱ्यावरी
तूच येऊन आवेगासी
क्षणी कविते आवरी

नवरसांची भूषणे तुज
भावनांची अर्चना
आत्मरंगाची तुला गे
नित्य मज अभ्यर्चना

रोज येशी तू सुखे सखी
मज कुशीतून पहुडण्या
रोजची मन पंख लेऊन
आसुसते कविते गे उडण्या

सज्ज मी बघ कल्पनेच्या
उंबऱ्या ओलांडण्या
रोज सुंदर रूप नवते
ते तुझे मग मांडण्या

काव्यचित्रातील तू की
चित्र काव्याचे सखी
मी तुझी की तूच माझी
सांग कविते प्रिय सखी

एवढे वाटे मला की
मी नि तू ना वेगळ्या
भावमंजूषेत तूचि
देशी कवनांच्या कळ्या

नाव माझे गाव होते
ते तुझे साम्राज्य जे
मी पुन्हा भुलते तुला की
गोड तुझे अधिराज्य ते

श्वास येतो आणि जातो
एक कविता जन्मते
सार्थकी लागोत माझे
तुजसवे किती जन्म ते

दि.२१/०३/२०२४
सकाळी ०९.१४ वा.
जागतिक कविता दिनाच्या
काव्यमय शुभेच्छा




## (१७)
## जपून ठेवीन स्मृती होळीच्या

जाळून टाकू होळीमध्ये
जे जे बिनसले आपुल्यामध्ये
येशील का रे पुन्हा नव्याने
रंग आणु या जगण्यामध्ये

रागद्वेष हे लयास जावो
पवित्र अग्नी पेटून येवो
त्याच्या साक्षी नव्या उमेदी
नवीन सारे घडून जाओ


धुळवड इथली खुणा होळीच्या
खेळून घेऊ मनसोक्त पुन्हा या
रंग अनोखे उमटून येतील
इंद्रधनूचे नवे पुन्हा का

रंगपंचमी हासत येईल
वृंदावनी बघ रास ही रंगेल
राधा असो की तिथे गवळणी
प्रत्येकीचे काळीज दंगेल

एक रंग होऊ दे मनाचा
कधीतरी रे सखया सजणा
दे आळवुनी स्वर स्वर्गीचे
प्रीत खरी लाभू दे या मना

जपून ठेवीन स्मृती होळीच्या
धुळवड सुद्धा जपेन राजा
रंगपंचमी  बुडून जाईल
असे रंग अनमोल दे राजा

दि.२४/०३/२०२४
रात्री १०.४९ वा.



## (१८)
## ऋतू भावनांचे येती

हळुवार पालवीचे
ऋतू भावनांचे येती
कळ्या कोंब प्रीतभरल्या
मज ओंजळीत देती

विरहातला शिशिर हा
झडतात मीलनेही
भेटावयाची आस
आतूर की मनेही

फुलतात रंगभरली
सुमने मनात सारी
मधुमास गंधभरला
येतो तशात दारी

सृष्टी नवीच होते
कोकीळ कंठ गाई
मोहोर आम्रतरुवर
मादकता ठायी ठायी

प्रणयास जाग येते
हृदयी वसंत फुलता
जणु स्वर्ग लाभतो मज
प्रिये बाहुतून झुलता

ठेवू जपून सारे
मनकोंदणी पिसारे
ऋतू हा वसंत वेडा
वेडातले धुमारे

दि.२२/०३/२०२४
संध्याकाळी ०७.१७ वा.



## (१९)
## **वसंत बहरला**

तिने एकदाच प्रेमळ नजरेनं पाहिलं
तो तिचा होकार वाटला
वाटलं जीवनाचा शिशिर सरला
मनात सरसर वसंत बहरला

वाळलेल्या सुकलेल्या
प्रेमाच्या झाडाला
हिरवेगार कोंब फुटले
प्रीतपालवी खुलून सारे
मदनाचे वारे सुटले

तो दिवस कधीच विसरलो नाही मी
अजूनही मनाच्या तळाशी आहे ना
ती नाही मिळाली पण तिची ती नजर
चोरून मला पाहे ना

कित्येक वसंत आले,
सृष्टीला फुलवून गेले
तिचे माझे भेटणे जरी राहून गेले
मी मात्र त्याच वसंताच्या,
अजूनही नादात आहे
प्रीत माझी घरी दारी,
अनामिक वादात आहे

'ही' म्हणते काहीतरी अपुरं अपुरं वाटतं
मन तुमचं माझ्याशी अर्धमुर्ध भेटतं
किती वर्षे लोटली तरी तुम्ही माझे पुरे
नाहीच
कोण आहे ती,
जिच्याकडे काळीज तुमचं रेटतं

कसं सांगू, पुन्हा तो फुललाच नाही
तसा वसंत खुललाच नाही
तिचा हा वेडा पुन्हा
कधी कुणावरच तितकासा भुललाच नाही

दि.२३/०३/२०२४
दुपारी ०३.३७ वा.



## (२०)
## रंग अनोखे जपणे की

धुळवड धुळवड उडली आकाशी
अंगाऱ्याची रक्षा घेऊन
पवित्र पावन होळीमधल्या
खुणा जराश्या अंगी लेऊन

आधी जाळणे जे ना पावन
मनात जे जे असे अमंगल
तेंव्हा खुलतील रंग सुरंगी
वर्ण वाटतील किती सुमंगल

निसर्गातले रंग रंगीले
जगण्यामध्ये आणू या
रंग होळीचे उत्साहाचे
रंग प्रेमाचे जाणू या

गालावरती रंग लावता
खळीत बुडूनी हसतील ते
पक्के होऊन आणि मनाच्या
खोल तळाशी बसतील ते

रंगांमधल्या आठवणींचे
रंग अनोखे जपणे की
दरवर्षीच्या होळीमधले
क्षण सुंदरसे टिपणे की

दि.२५/०३/२०२४
सकाळी ११.५१ वा.



## (२१)
## वासंतिक राग

कुहुकुहू सुरात येते जाग
गा कोकीळ वासंतिक राग
फुलली पाने कळ्या उमलल्या
बहरते मनी प्रीतीची बाग

स्वच्छ सकाळी स्वच्छ नभातून
खगमाळांच्या रांगा उडती
यौवनातल्या गुजगोष्टींनी
पानोपानी कलिका दडती

झुळूक हवेची शीतल येते
थंडावा जगण्याला देते
सुगंध सारे वाऱ्यावरती
अत्तर कुपी उघडूनिया जाते

बने मोगऱ्याची खुलून हासली अन
तिथे जाग गुलमोहराला आली
नभी रंग येती नव्याने नवेसे
नवी दृष्टी सृष्टीत डुंबून गेली

मला वाटते जन्म येथे रूळावा
मधुमास हृदयात ऐसा फळावा
फुलांच्या परागात लपले जे भाव
तुलाही असा भाव सहजी कळावा

दि.२७/०३/२०२४
सकाळी ०८.३८ वा.



## (२२)
## एक अनामिक भीती

एक अनामिक भीती उगाचच
मनातून का वाटते
उजेडातही अंधाराचे
जाळे उगा का दाटते

उरात दडपण वाढत जाते
उत्तर नाही प्रश्न सारखे
नकळत सारे घडताना मग
जे जे माझे मला पारखे

कुठून एवढी घेरत रहाते
चिंता मनाला पोखरते
कितीही टाळणे म्हटले तरीही
खोल उदासी सदाच ठरते

धूसर पुसटसे चित्र वाटते
रंग फिके ते अनोळखीचे
अनाम वाटा अनाम नभही
अनाम साथी कधी ओळखीचे

अर्थ न कळती भावही परके
जग कोरडे नयन कोरडे
निर्जन जागी टाहो फोडुनी
जणु हृदय मज आर्त ओरडे

दि.२८/०३/२०२४
सकाळी ०८.५६ वा.



## (२३)
## म्हणून ही सुरंगी सखी वाटते ग

सुरंगीच्या गजऱ्यात मन माझे गुंते
तुझ्या भेटीसाठी अजूनही ते खुंते
भेटून दोघे जे बोलत असू ना
सुगंधित क्षण ते मुखी एक हसू ना

हळुवार मी माळताना सुरंगी
तुझ्या केशसंभारी का लाजते ग
उगा का अशी कंपिता होऊनी तू
नजरेस झुकवून अजब वागते ग

जितकी तू जाशील प्रिये दूर दूर
जणू मजसी जवळी तू येण्या खुणावे
असे वाटते पाहुनी मुग्ध चाळे
तुझ्या मीलनी ओढ माझी दुनावे

कसला तो मादक असे गंध वेडा
तोही भुलावा तू इतकी ग लोभस
असे वाटते निरखुनी तुजसी घ्यावे
तुझ्याने हे जीवन करिशी ग शोभस

तुझ्या माझ्या हृदयी सुरंगीचे काळीज
मळे सुरभीचे ते अजुनी वाहतात
क्षण मोहणारे तिथेची अजूनी
तुझ्या कुंतली ताजेसे राहतात

म्हणून ही सुरंगी सखी वाटते ग
तिच्याने मनी प्रीत मज दाटते ग
पुन्हा तोच येईल ऋतुराज हासत
सीमा सुखाची चरम गाठते ग

दि.२९/०३/२०२४
सकाळी ०७.४७ वा.




**(२४)**

**झाड अंगणात माझ्या**
**रंग रंग रंग झाले**

रंग भरले आकाशी, तरुवर पसरले
इंद्रधनू का देवाचे धरणीशी विसरले

झाड अंगणात माझ्या रंग रंग रंग झाले
त्याची खोडे पाने फुले रंग रंग रंग झाले

आज मन पंचमीला रंग होत उधळले
वृंदावनी राधा आणि श्याम रंगरंगाळले

कुठे कुठे रंग कसे सांगू रंग हरिसंग
रंग रंग अंग मन मन दंग असे रंग श्रीरंग

जन्म भरे रंग उमंग सूर रंग गीतरंग
रंग माझा रंग तुझा रंग त्याचा एकरंग

दि.३०/००३/२०२४
रात्री ०८.५९ वा.



## (२५)
## घरीदारी मनी मनी

माझी गोड मनीमाऊ
किती करते ती लाड
खोड्या करते अनेक
जरी आहे बरं द्वाड

पंजा फिरवून देते
माझ्या गालावरती ती
अशी मायाळू मनुली
म्याऊ म्याऊ करती की

घारे घारे डोळे तिचे
त्यात मायेचा सागर
बसे मांडीवर माझ्या
अंगावर घे चादर

दूध पनीर नि लोणी
तिच्या तोंडालाच पाणी
सूर छेडते मधेच
तिची तिची गाई गाणी

घरीदारी मनी मनी
आली आमुच्या जीवनी
कसे प्रेम नि जिव्हाळा
सांगा जडवेल कोणी

दि.३१/०३/२०२४
सकाळी ०८.५८ वा.



## (२६)
## स्वस्तिक

आठवतं अजूनही मला
ते गावकडचं घर
घरापेक्षा मोठं अंगण
अंगणातली ऐसपैस जागा
झाडावेलींची हिरवाई

परसदारी फुलझाडं
स्वयंपाकात मदत करणाऱ्या भाज्या
कढीपत्ता लिंबू मिरची वांगी टमाटे
घरात आपुलकी
अंगणात परसदारी माया

येणारे जाणारे पै पाहुणे
पाहुणचार, खुणावणारं दार
दरवाज्यावर भिस्त
आतल्या जगाची
बाहेरच्या जगाला दाखवायची
हवं तितकं आभाळ समेटून घ्यायची

एक सीमा परंपरेची
घराण्याची कुळाची
उंबऱ्यावरची लक्ष्मी

पहाटेची सडा रांगोळी
रांगोळीतले स्वस्तिक
अशुभाला परतावून लावणारे
शुभ चिन्हांचा राजा बनून
घराला जपणारे

गोपद्मांच्या जोडीने विसावलेले
ते स्वस्तिक
किती किती आठवते म्हणून सांगू
सारे घर याच्या भरवशावर असल्यासारखे
दिमाखात उंबऱ्याशी रेखलेले

असं वाटायचं की
या सृष्टीच्या निर्मात्याला
घराकडे लक्ष ठेवायला लावत असे
ते स्वस्तिक
स्वर्गीय मंगलाची खूण
आपल्यात सामावून हसत असे ते स्वस्तिक

'स्वस्ति अस्तु' असा जणू
आशीर्वाद देत
रोज नव्याने रेखलेलं
हळदीकुंकू अंगावर लेऊन
ठसठशीत उठून दिसणारं
ते स्वस्तिक

डोळ्यासमोरून जातच नाही
सारखं तरळत राहतं ते स्वस्तिक

दि.०१/०४/२०२४
सकाळी ०६.११ वा.

## (२७)
## काटे जागोजाग

बाग जगाची ही न फुलांची
काटे जागोजाग
वरवर वाटती कारंजी ही
असे मुळाशी आग

कुणी कुणाला गोड बोलते
हेतू कडू हजार
अर्थ लावूनी थकतो मेंदू
मनही हो बेजार

हसऱ्या चेहऱ्यामागे अगणित
दुःखांचे बाजार
वर शृंगारल्या कायेमध्ये
दडलेले आजार

शब्द पांघरून येती माया
कपट उरी किती आत
जन्मभरासाठी धरलेला
सहज सोडे कुणी हात

कळते ना सहजी जगतामध्ये
काळीज खरेखुरे
म्हणून वाटते जीव लावणे
कोणासही हे पुरे

वरपांगी बेगडीच दुनिया
मुखवट्यात मुखडे
भावुक माझ्या सालस ह्रदया
होतील किती तुकडे
तुझे रे, होतील किती तुकडे

दि.०२/०४/२०२४
सकाळी ०९.५३ वा.

## (२८)
## आता कठीण

शब्दबंबाळ घाव मोठे
कोसणे आता कठीण
दुःख देती शब्द जेंव्हा
पोसणे आता कठीण

आत वैरी एक बसतो
खातो जो मज पोखरून
आतल्या जखमा न दिसती
सोसणे आता कठीण

गूज ज्याला सांगणे तो
टांगूनी वेशीवरी
दुरुनी उपहासे करी त्या
खोसणे आता कठीण

घाम गाळून दाम आणता
शांतता जर का नसे
भवनेविण घास तोंडी
ठोसणे आता कठीण

वाटेवरती पेरूनी
काटे सुरुंगाचे पुन्हा
जीवनाचा डोस फुकटा
ढोसणे आता कठीण

दि.०२/०४/२०२४
रात्री ०८.४९ वा.



## (२९)
## बोल प्रीतीचे

बोल प्रीतीचे ऐकण्या
मन अधीरले किती
जन्मभराची प्रतीक्षा
उरी धडधड भीती

आस लागली जीवाला
जीवलग माझा झाला
असे पडताच स्वप्नं
ऋतुराज वनी आला

उमलल्या ह्या कळुल्या
गंधाळून ग पाकळ्या
लाजलाजून हासल्या
गाली गुलाबाच्या खळ्या

अंग अंग शहारले
मनी कारंज फवारे
तुषारांच्या आनंदात
बेभानले प्रीतवारे

आता देशील होकार
जीवनात ये सकाळ
प्रीत जगण्याचे सार
असो प्रेमाचा सुकाळ

दि.०४/०४/२०२४
सकाळी ०९.४८ वा.



## (३०)
## ती आणि मोगरी

मोगऱ्याच्या फुलांची करंडी
किती खुणावत राहते न
सुगंधभरल्या डोळ्यांनी
प्रेमाने पाहते न

कधी वाटते अलगद गुंफून
प्रेयसीच्या केसात जावे
कधी फुलांना देवापायी
भक्तिरसात नाहत वहावे

कधी नुसत्याच ओंजळीत
प्रेमाची कबुली देऊ की नको
ह्या गोंधळात कळ्याही म्हणत
बसतात फुलू की नको

किती दाहक उष्म्याच्या
काहिलीचा त्रास
तरीही क्षणात कमी होतो
येताच मोगऱ्याचा सुवास

उगाच वाटत राहते
ती अवचित  येईल
मोगरीसारखी तिच्या प्रीत गंधात
मला बुडवून देईल

ती आणि मोगरी
सारख्याच वाटतात
ओसाड रुक्ष वातावरणात
परिमळ देत भेटतात

दि.०५/०४/२०२४
सकाळी ०९.३२ वा.



## (३१)

## चुडा जपला मनी मी

सखे साथी चुडा माझा
लग्नापासून जाहला
हिरव्या रंगाचं गुपित
अंगी लेऊन राहिला

किणकिण मधुराची
संगे सखे ती असते
स्वप्नफुलांना हळव्या
घेऊनिया की हसते

नववधूच्या भावना
कानी प्रीतीच्या सांग ना
राजसाच्या खेळविती
अंगा अंगावर खुणा

मेंदीभरल्या क्षणांना
चुडा सजवीत जातो
एक नाद वेडावला
कसा जडवीत जातो

सप्तपदी चालताना
हात हातात घेताना
चुडा पाहतो साक्षीने
सजनाची मी होताना

लाजाहोम लाजलेला
चुडा गाली हसलेला
भेट पहिली वहिली
प्रतीक्षेत बसलेला

चुडा जपला मनी मी
कपाटातल्या खणी मी
जीवनाची सुरुवात
तीच नवी मी जुनी मी

चुडा आजही सांगतो
स्पर्श रेशमी सुखाचे
रुळताना मनगटी
झंकारणे स्पंदनाचे

दि.०६/०४/२०२४
रात्री ०९.५३ वा.



## (३२)
## रेश्माचं पाणी पाणी

धुंद पावसाची धार
अंग भिजूनीया गार
चला चला रे पिलांनो
थंडी वाजतेय फार

सारा डोंगर ओघळे
झरझर झऱ्यावाणी
गवताच्या अंगावर
रेश्माचं पाणी पाणी


झाडं अंघोळ करती
स्वच्छ सुंदर दिसती
बीज जमिनीमधले
गोड गालात हसती

पाने पाने चिंब ओली
तरारून मने गेली
रानारानात सुगंधी
माती अत्तरांची झाली

केस अंगावरले हे
असे उभारून आले
करू पानांची छतरी
रान हुडहुडी झाले

या रे पिल्लांनो जवळी
ऊब आईची कवळी
जरा पाऊस पाहू या
त्याची गाणी सोनसळी

दि.०७/०४/२०२४
०९.०४ वा.



## (३३)
## ये ग ये रखुमा राणी

ये ग ये ग रखुमाई
साऱ्या जगताची आई
राबराबतेस किती
माझी अर्धांगाई

चूल पेटती रहावी
होते अन्नपूर्णा तू
पालनास जगताच्या
जीवरस भरणा तू

तूच स्फूर्ती प्रेरणा
तूच संकट तारणा
असुरांशी लढताना
तूचि काल गे मारणा

स्मृती बुद्धी मती तूच
प्रज्ञा मेधा नि प्रतिभा
माय सरस्वती रूप
तुझी ज्ञानाचीच आभा

चालवितो मी संसार
जगताचा पालनहार
असे वाटे जगा परि
माझ्या शक्तीची तू धार

फुलावाणी तू नाजूक
काळजानं कवळी ग
वेणी शेवंती माळतो
माझी मनपाकळी ग

ये ग ये रखुमा राणी
तुझ्या ओठी हासू गाणी
तुझी माझी जोडी राहो
जगी माय बापावाणी

दि.०८/०४/२०२४
सकाळी ०९.२९ वा.



## (३४)
## उभारू गुढी नव्या दमाची

नव्या वर्षाची नवीच आली
पहाट नाचत धुंद
उभारू गुढी नव्या दमाची
नवेच जोपासू छंद

सकाळ न्यारी नवी खुमारी
हर्षाची स्फुरणे उसळती
झेंडूची फुले दारी तोरणे
आंब्याच्या पानी मिसळती


सडा संमार्जने रांगोळी शोभे
रंगात उंबरा प्रसन्न भासे
घरीदारी लाट उत्साहाची आणि
तरंग सरिता खुशीची हासे

सुस्नात होऊनी करू उभारणी
ब्रह्मध्वजासवे गुढीची काठी
रेशमी वस्त्रे फुलांच्या माळा
कडुलिंब तुरा, साखर गाठी

धूप दीप लावू ओवाळू तिला
नववर्षाच्या आरंभ दिनी
पुरणपोळी नैवेद्य ठेवू
नव्या सुखाच्या आशाही मनी

द्याव्या घ्याव्या मग शुभकामना
वर्षाच्या प्रारंभी शुद्ध भावना
गुढी उभारू नवोत्कर्षाची
नवोदय मधुमासी चेतना

दि.०९/०४/२०२४
चैत्र शुद्ध प्रतिपदा, क्रोधी नाम संवत्सर,
शालिवाहन शक १९४६ आरंभ
गुढीपाडवा शुभकामना
सकाळी ०९.२३ वा.




## (३५)
## बळ तू देशील तर

गर्द दाटसर तुझ्या सावलीत
ठाव मिळू दे मजला
तप्त उन्हाच्या झळा पोळती
एक दिलासा इथला

नाही नाही म्हणती कोणी
दिसत तुझे ते रूप
कुणा वाटते आत उलगडे
खरे तुझेच स्वरूप


पानामधल्या सळसळणाऱ्या
हवेस एक विचार
आत बसुनी जे चालवी सारे
प्राण तुझे व्यापार

डोळ्यामधल्या तेजाला जर
देईन तुझेच नाव
दिसते न दिसते तुझेच असते
एक अनामिक गाव

काडी इथली माडी इथली
झाडीही इथली
जोवर असते कृपा तुझी बघ
वाडीही इथली

इतुके समजून घ्यावे निश्चित
उमजून येशील जर
वरपांगी हे जगत चालते
बळ तू देशील तर

दि.१०/०४/२०२४
रात्री ०९.४९ वा.



## (३६)
## ओठ शिवले

ओठ शिवले अनेक धाग्यांनी
जीवनातल्या अनुभवांनी
मौन वाटते असेच रहावे
काय साधते बोल शब्दांनी


व्यर्थ दवडणे वाफ मुखाची
सार वाया जाई सारे सारे जे
आत केवढे दडले जगणे
न पाहता त्यास वर वारे हे

प्राण सारे होती गोळा बोलण्या
शक्तीचा ऱ्हास रोज अगणित
म्हणून वाटे व्रत कथीले
पूर्वजांनी हे मौन भणित

आत चालू द्यावा संवाद सारा
आत सापडते उत्तर तेंव्हा
प्रश्नांचे रान गहन वाटे
नकळता त्याचे मूळ हे जेंव्हा

एक शांतता लाभते मग
शब्देविन सारे जुळते जग
निवांत क्षण मनी तरंग
आनंद मोदाचे भरती ढग

दि.११/०४/२०२४
रात्री ११.३५ वा.



## (३७)
## मन हिरव्या क्षणांचे

आस हिरव्या तळ्याशी
काठ हिरवे भरले
तृण ताजे हिरवाले
हिरवाई पांघरले

झाडं हिरवे हिरवे
वेली हिरव्या बरव्या
कलिकाही हिरव्याशा
हासू गोडाले झरव्या


लाटा हिरव्या हिरव्या
वाटा हिरवाईतल्या
पायी रेशीम हिरवी
माया मिरवाईतल्या

झाडी हिरवीगार ती
हिरवली गार हवा
पाचू ओसरले किती
रंग हिरवार नवा

नभ हिरवुसलेले
जळ हिरव हिरवे
भुई हिरवी तरवी
सुख हिरवे मिरवे

घरकुल हिरव्याशा
ऱ्या भऱ्या स्वप्नांचे
घरदार हिरवाळ
मन हिरव्या क्षणांचे
मन हिरव्या क्षणांचे....

दि.१२/०४/२०२४
सकाळी ०८.११ वा.



## (३८)
## रोज नव्याने जन्मा यावे

मुक्त श्वास हे भरले मी जे
तसेच कायम भरून घे
जगण्यासाठी काय दुजे पण
स्वच्छ प्राण हा करून घे

दडपण कसले किती दबाव हे
उगाच माणूस पिचतो ना
जे जे आहे मुख्य ते तरी
सारे विसरून खचतो ना

रोज सकाळी आशाकिरणे
सोबत घेऊन उगवावे
रोज पहाटे नवेच जगणे
मानून गाणे तगवावे

ताज्या ताज्या सृष्टीमधले
विचार का हो शिळे तरी
वळतच नाही आम्हा वागणे
तत्त्वाने जरी कळे तरी

सोडून द्यावे जरा मोकळे
काया माया साऱ्यांना
येऊ दे खुल्या गंध वाहत्या
अवखळ शीतल वाऱ्यांना

मुखी हास्याचे कमळ उमलता
डोळ्यामध्ये चमक उठे
जाईल विरून ही घोर निराशा
नव्हती नाही नसेन कुठे

रोज नव्याने जन्मा यावे
नवीच नाती निभवावी
पेरून द्यावे बीज नव्याने
नवीच सृष्टी उगवावी

दि.१३/०४/२०२४
सकाळी ०७.३८ वा.



## (३९)
## अले किती गोड तू

अले किती गोड तू
सोन्याची फोड तू
छोटुशा दोस्त माझा
प्रेमाचा जोड तू

ये ना ये जवळी
खाऊ या सोनकेळी
हासू तुझं माझं रे
हसताच हसे खळी

केश तुझे माझे
सोनेरी चमचम
दात कशे आपुले
आनंदी घमघम

तुझं माझं जमतं
नातं रे कोणतं
सवंगडी तू
मन खळखळतं

नको मोठं होऊ या
बाळंच राहू या
रोज रोज भेटून
खेळत राहू या

दि.१३ /०४/२०२४
मध्यरात्री १२.५७ वा.



## (४०)
## तुझी कारागिरी गोड

पानापानात कलेचा
दिसतो की हा नमुना
रंग कातरा आकार
देठ घडवितो तू ना

अगणित पाने फुले
अगणित झाडं वेली
कसे गणित मांडावे
कुणी रचना ही केली


आरपार रेषांतून
कधी हसतोस तूच
कळी फुलातून देवा
गोड दिसतोस तूच

माझी मती गुंग होते
ब्रह्मांडची दंग होते
कणकण तुझा आहे
तुझी कृपा संग होते

म्हणूनची नाही कधी
वाटे मनाला निराशा
श्वास घेत राहताना
प्राण हेच तुझी भाषा

रूप सुंदर वाटते
क्षणाक्षणाला भेटते
तुझी कारागिरी गोड
डोळा पारणं फिटते

दि.१५/०४/२०२४
सकाळी ०९.२१ वा.



## (४१)
## ऐक ऐक तू बकुळी

तुला पाहता आठवे
रूप साठवे चढावे
बकुळी ग सानुली तू
गंध अजोड जडावे

गोड सुरभीचे आत
कोष भरले कुठून
सावळ्याशा रंगातही
दिसशी तू उठून

तुला काय म्हणू राणी
तू ग तन्वी नाजुका
जशा पाकळ्या कवळ्या
मनानेही तू साजुका

देणे सारे सारे ठावे
रसिकाला तू सोपवी
तुझ्या गंधाचाच छंद
साऱ्या जगता लपवी

तुला ओंजळीत घेते
गजऱ्यातून माळते
श्वासासवे तू येता
मी रोजची भाळते

ऐक ऐक तू बकुळी
व्हावे तुझी एक कळी
दडते जी पानामध्ये
तिच्या गाली गंध खळी
तिच्या गाली गंध खळी
माझे लाडके बकुळी ....

दि.१६/०४/२०२४
सकाळी ०६.१२ वा.



## (४२)
## प्राण येती तरारून

असे वाटते रमावे
शांत सृष्टीत कधी ते
एकटेच नको कोणी
रव ऐकावे आधी ते

स्पर्श गारवे जळाचे
चरणांशी रुळताना
जरा भेटावे स्वतःला
स्वतःशी जुळताना

दूर डोंगराशी जावे
उंचावरून जोखावे
खाली धरेची ती खोली
वर अंबर झोकावे

तिथे उगवतो रोज
दिनमणी न चुकता
घ्यावे पाहून तयाला
लावण्य ते न हुकता

आकाशात केशराचे
मळे खुलवतो कोण
रंग टिपून मनाशी
विसावावे क्षण दोन

अशा चैतन्याच्या घ्याव्या
भरभरून त्या गोण्या
आठवाव्या स्मृती पुन्हा
उदासल्या राती कोण्या

जाई मळभ सरून
प्राण येती तरारून
झटकन एकरूप
व्हावे पट ते सारून

दि.१७/०४/२०२४
सकाळी ०६.११ वा.




## (४३)
## जय जय श्रीराम

राम एक नाम ऐसे पावन हे धाम
कर्म किती त्यागी, आचार अभिराम
राम राम राम बोला, जय जय श्रीराम
जय जय श्रीराम ।।

युगयुगे हो लोटली तू आदर्श काम
एकवचनी एकपत्नी एक रामबाण
राम राम राम बोला, जय जय श्रीराम
जय जय श्रीराम ।।


निर्दालून असुरांना तू प्रत्यंचा ताण
सज्जन रक्षण करण्या अवतरला राम
राम राम राम बोला, जय जय श्रीराम
जय जय श्रीराम ।।

आजही इतक्या शतके राज्य तुझे आण
संपला रे वनवास, साकेत जगती मान
राम राम राम बोला, जय जय श्रीराम
जय जय श्रीराम ।।

पाप हरण पुण्यकरण शक्ती राम नाम
मनमंदिरी एक वसो अजरामर नाम
राम राम राम बोला, जय जय श्रीराम
जय जय श्रीराम ।।

धर्म नीती सत्य म्हणजे एक नाम राम
भक्तांचा तारक हा हनुमत्प्रभू राम
राम राम राम बोला, जय जय श्रीराम
जय जय श्रीराम ।।

दि.१७/०४/२०२४
रात्री ०८.२५ वा.



### (४४)
### मना हरवले आहे

कुणी ऐका येथे काही
मौन बोलतात छंद
सळसळ पानातली
करा ह्रदयात बंद

इथं रेंगाळती वेळा
असो सकाळ दुपार
संध्याकाळी देई सांज
अळोखेपिळोखे फार

झाडावेलींच्या चाळण्या
पानापानांच्या गाळण्या
असो प्रकाश उन्हे की
गाळून घ्या हो चांदण्या

सारे सारे बोलतात
शब्देविण सांगतात
वळणाच्या वाटा किती
नखरेल पांगतात

शांती शांततेत राहे
दृश्य निरवसे पाहे
कुणीतरी त्या तिथे ग
मना हरवले आहे

दि.१८/०४/२०२४
सकाळी ०६.३२ वा.



## (४५)
## अरे बोक्या दादा

अरे बोक्या दादा
डोकावून पाहू बाबा
दिसतोस मला थोडा
मीही तुला दिसे आधा

असे एकमेका पाहू
गाली छान हसताना
उघडा मी जसा आहे
तुही तसा असताना

तुझे डोळे घारे भुरे
वर कानांचे हे तुरे
टवकारून पाहशी
काय हवे सांग तू रे

मला खेळाया आवडे
गप्प बसणे नावडे
दूध दही फस्त कर
मग उंदीर पकडे

ये ना ये तू हळू हळू
नको कुणालाच कळू
म्यांऊ म्यांऊ नको आता
चल दोघेजण खेळू

होशी दोस्त जर माझा
पक्का मुक्काम हा तुझा
याच घरी होऊ दे की
किती येईल रे मजा

दि.१९/०४/२०२४
सकाळी ०५.५७ वा.



## (४६)
## ते बालपण शाबूत राहावं

एक बंद प्रवेशद्वार
दोन जग वेगळे
इथे अजून बालपण उनाड
तिथे मोठे होतायत सगळे

इथे हाती खेळण्या नि
आकाश सारे मोकळे
तिथे शिस्त गणवेश आणि
बंधने ही आगळे

गदा हाती फिरवत इथे
हनुमान उडी
तिथे अभ्यास पाठांतर
चुकले की छडी

जायचंय त्यालाही तिकडे
शिकून मोठं होण्यासाठी
त्यांनाही आणावे इकडे
कधी मुक्त बागडण्यासाठी

हरवणं नको कुणाचंच काहीच
ते बालपण शाबूत राहावं
इकडच्याने तिकडचं आणि
तिकडच्याने इकडचं स्वप्नं पहावं

दि.२०/०४/२०२४
रात्री ०७.२८ वा.

## (४७)
## क्षणी सुवास सुखाचा

शिडकावा वळवाचा
हुळहुळणारी माती
गंध ओलसर नवा
सर हलकीशी हाती

गेला तापून हा जीव
आग ओकताना रवी
धारा घामाच्या वाहती
वळवाने आस नवी

आसमंत गंधाळतो
अत्तराच्या दाही दिशा
हुंगताना माती वाटे
किती मानावे त्या ईशा

कसे बदलून जाते
सारे हवेसे वाटते
काया शीतल होताना
मनी वर्षा दाटते

असा वळवसरींचा
पडो पाऊस सुखाचा
दुःख पोळताना देवा
क्षणी सुवास सुखाचा

दि.२१/०४/२०२४
रात्री १०.३० वा.



## (४८)

## नीलवसने नयनमधुरे...

नीलवसने नयनमधुरे
राधिके घे प्रीत ही
नील कमलातून माझ्या
भावनांची रीत ही
नीलवसने नयनमधुरे...

तू हृदय माझे हिरावून
कृष्ण राधा जाहला
शोधतो तुजला कुठे तर
आत माझ्या राधेला

प्रेम हे कसले न जाणे
प्रेम तू इतके कळे
हरवुनी जातो स्वतःला
तू नि मी ना वेगळे

कोणत्या गाठी कधीच्या
युगयुगांच्या रेशमी
हळवी राधा मजसी बाधा
राधेमय हा देख मी

चैन नाही या मनाला
कोणते अनुबंध हे
घे प्रिये काळीज देतो
कमळ ना अनुरंग हे

मी कधी तुजविण स्वतःला
वेगळा मानू कसे
घे समर्पण करतो अर्पण
मन हाती आणू कसे

दि.१८/०४/२०२४
सकाळी ०९.०३ वा.



(४९)

## आई आईच असते

माय छत होत जाते
आभाळ गळताना
देह छत्री करते
ऊन्हं झळा झळताना

तिची ऊबदार ऊब
ऋतू कोणताही असो
तिच्या स्पर्शात गोडवा,
नजरेत गाव वसो

तिचा पोलादाचा देह
मन मऊशार लोणी
आई विना देव इथं
डोळा पाहिला का कोणी

तिच्या दिवसात युगे
जाती सामावून रोज
पिल्लांसाठी सोडते ती
किती सहजीच नीज

किती सोसते भोगते
देह झिजवून देते
बीज मायेचे पेरून
स्वतः उगवून येते

सुख मिळावे बाळांना
दुःख डोईवर झेले
देई अमृताचा पान्हा
पीत विषाचे ही पेले

तिचे रूप कोणतेही
माय आई पाखरू की
पशु पक्षी कीडा मुंगी
प्रिय गाय वासरू की

आई आईच असते
तिच्या हृदयी वात्सल्य
माय असते म्हणून
किती विसावते बाल्य

नाही उपमा कशाची
माय लेकरांस जगी
आई नसता जगात,
सारे  पोरके ना उगी

आईपण नाही सोपे
देह मन काळीजही
आई आत्म्याचे नाव
परमात्मा तीच ही

दि.१८/०४/२०२४
रात्री ११.५४ वा.



## (५०)
## आई नावाचं पुस्तक असलं

आई नावाचं पुस्तक असलं
कसं वाचावं कळंचना
झरा मायेचा कुठून व्हातोया
अक्षर प्रेम हे वळचना

रागावती अन जरी कावती
आत तिला ते बोचत जाय
अखंड वात्सल्याच्या धारा
प्रेमळ सरिता असतीया माय

खस्ता खाऊन कष्ट उपसती
पान पुस्तकाचे ती जिव्हाळा
तिची बांधणी पक्की इतकी
किती जन्माचा लावते लळा

तिच्या पुस्तकावरती न नाव
तिचे कोणते नाही गाव
झिजवत जाते अखंड काया
चंदन काळीज सुगंध ठाव

क्षणात करते मोठा त्याग
जीवनी फुलवुन देते बाग
झळा न लागती असता ती
दूर राहते दुःखाची आग

आई नावाच्या पुस्तकातले
जमतील जर का वाचून घे
मंगल सुंदर क्षण मायेचे
फुलापरी ते वेचून घे


आई असता किंमत न कळे
नसता पडते भुई थोडी
काया पुस्तक जाते येथून
अक्षर आठवणी गोडी

डोळ्यामधले आसू पाहून
ती स्वर्गातून मग रडते
आईवाचून पवित्र प्रीती
कुणी न करते बघ अडते

तिच्यावचूनी जगणे निष्फळ
नीरस मन हे लुळे पडते
ती असताना स्वर्ग भुईवर
किमया ऐसी रे घडते

म्हणून ज्यांच्या जवळी हे पुस्तक
भाग्यवान ते या जगती
आई आई हे नाव अगाधची
अमोल ईश्वरी रूपच ती

दि.२३/०४/२०२४
सकाळी ०८.२१ वा.



## (५१)
## तप्त झळा मातल्या

तप्त झळा मातल्या
ओकतात आग ही
भुईमध्ये दबलेल्या
उष्म्याला जाग ही


सकाळीच तापतो
तळपतो मार्तंड
राग त्याचा अनावर
ताप वाटे प्रचंड

गरमीचा उच्चांक
अंगी लाही लाही
जीव असो कोणताही
ओरडतो त्राहि त्राहि

दोष निसर्गाचा ना
मानवाचा आहे हा
तोडुनिया जंगलांना
प्रगतीला पाहे हा

घालविली हिरवाई
संकटात धरती आई
आपल्याच विनाशाची
माणसा तुला का घाई

दि.२४/०४/२०२४
रात्री ०८.०३ वा.



(५२)

**मायंदळ मायंदळ देऊन जा**

मायंदळ मायंदळ देऊन जा
झोळी फाटकी घेऊन जा
जरा जरासे मला सख्या रे
तुझ्या कृपेने पाहून जा
मायंदळ मायंदळ देऊन जा....

मनात ठेवीन सुगंध सारा
गाभाऱ्यात त्या राहून जा
भावभक्तीची फुले उमलली
मायंदळ मायंदळ हुंगून जा

तुझ्या भेटीची आस जीवाला
जन्म सांगतो न्हाऊन जा
कणाकणातून तोच राहतो
मायंदळ मायंदळ घेऊन जा

कर्म आधीचे गतजन्मीचे
संचितातले भोगून जा
भजन तयाचे जपता जपता
मायंदळ मायंदळ गाऊन जा

उघड्या नयनी सृष्टी सारी
कर्तुत ते स्वीकारून जा
मिटता डोळे रूप तयाचे
मायंदळ मायंदळ पाहून जा
मायंदळ मायंदळ पाहून जा

दि.२५/०४/२०२४
सकाळी ०९.३२ वा.



## (५३)
## एकदा येऊन जा

एकदा येऊन जा रे
पाहण्या मन एकटे
का उगा वाटे उदासी
ही भकासी भेटते
एकदा येऊन जा

केस माझे गुंतलेले
झाले वेडे मोकळे
ते तरी निर्जीव वाटती
ओके बोके ओकळे

ही नजर माझी कुणाला
पाहते ना सांगते
शून्य तेथे शून्य येथे
का जीवाला टांगते

अंगठी बोटात राहे
मूक जैसी भावना
तीही आता आस सोडून
भांडते माझ्या मना

या जळाच्या उठती उर्मी
प्रश्न अगणित थांबले
का दिशा झाल्या निरुत्तर
वागणे का हे चांगले

सांगते मी ऐक जमले
तर तुला रे एकदा
वेड माझे ओळखून घे
भेटुनी जा एकदा

दि.२६/०४/२०२४
सकाळी ०७.१४ वा.



**(५४)**

**सांग रे माझ्या मना**

का उगा बघतोस इतके
नजरेतुनी का खोडी ती
उडवुनी देतो बटांना
पवन अवखळ गोडी ती

चालतो माझा प्रवास नि
तू प्रवासी वेगळा
रोज रोजची थांबसी अन
नाद वेड्या आगळा

राग मानू मी कसा तू
भाव अनुरागी जसा
बोलक्या त्या कामना नि
तू विरागी रे कसा

वाचशील वाटे कधी तू
मानसीच्या कल्पना
ओठ माझे बंद जरीही
नयन करती जल्पना

थांब थोडे मिटून डोळे
वाढती ठोके पुन्हा
भाळसी का रोज त्यावर
सांग रे माझ्या मना

दि.२६/०४/२०२४
सकाळी ०८.३९ वा.



## (५५)
## या अबोलीसारखी मी

या अबोलीसारखी मी
आज झाले मूक की
बोलण्याची केवढी
होती कधी मज भूक ती


ऐकणारा कोणी माझा
नाही समजून घेतले
आत ओले मनही माझे
वणव्यासम का पेटले

शब्द माझी भूषणे
कोमल सुरांनी दाटली
त्याचवेळी मग दग्यांनी
मन भुई मज फाटली

नजरेतुन ओसंडलेले
द्वेष किती मी साहिले
काळजाच्या माणसांना
पलटता मी पाहिले

जाहले होते जुई मी
जाई प्राजक्ता कळी
आज आहे बघ अबोली
मुसमुसून रडे एकली

दि.२८/०४/२०२४
सकाळी ०७.५३ वा.




**(५६)**
**तेज दीप उजळले**

नीज डोळ्यात उरली
निशा गुंगून सरली
पहाटेला प्राचीवर
तेजशलाका फिरली

अरुणोदयाच्या सवे
रवीराज उगवला
झणी आसमंत त्याने
सोत्साहाने जागविला

वारा घुमड घुमड
सूर घुमवीत आला
फांदी फांदीवर
खग मेळा गलबला झाला

पूजा राऊळी मांडली
ईश आराधना चाले
समईच्या ज्योतीतले
तेज दीप उजळले

रूप ओंकारस्वरूप
त्याचे अनादी अनंत
त्याचा नाद ओंकाराचा
घुमतो पहा दिगंत

रोज सकाळ सकाळी
अशी गाभाऱ्यात यावी
मन उजळून जाता
नव्या नवती पहावी

दि.२९/०४/२०२४
सकाळी १०.२२ वा.



## (५७)
## निजानंदाचे कमळ

निजानंदाचे कमळ फुलू दे
समाधान सरोवरी
आत्मानंद हृदयमन्दिरी
स्वर्ग विलसे भूवरी

एक एक पाकळी उमलू दे
दुःख पंक तुडवुनी
परमानंद हा सतत लाभू दे
कोशवृत्ती उडवुनी

अशी उगवता सकाळ प्राची
उजळून दाही दिशा
तेज पसरू दे तमा विसरू दे
जागताना ती जिगीषा

जळ संसारी लाटा कहारी
झोक न जाणे बरे
अहंकाराचा वारा न उपटो
मूळ विसरणे न खरे

जसे हे फुलणे जीवा जीवाचे
तसेच मिटणे आहे
जीवा शिवाचे परम एकदा
मुक्त भेटणे पाहे

दि.३०/०४/२०२४
रात्री ०८.०३ वा.



## (५८)
## झुंजूमुंजु गावामंदी

झुंजूमुंजु गावामंदी
नीज सुटते सहज
भल्या पहाटे गावाची
सुरू होते गजबज

भूमातेच्या चरणाला
हात जोडतात लोक
क्षमा मागून कामाला
सारे लागती बिनधोक

केशराच्या सड्यामंदी
रोज नाहते पुरव
पिंपळाच्या पारावर
जगण्याचा दिनरव

किलबिल पक्षी सारे
एका सुरात गात्यात
शेताकडं शेतकरी
उमेदीनं बा जात्यात

जात्यावरल्या ओवीत
जगण्याची रीत गाऊ
वासुदेव ये अंगणी
पसाभर दाणं देऊ

सडा शेणाचा घालून
चूल लिंपून ती घेता
देती भाकर रोजच
कालवण चव देता

दुध दुभत्या गायींची
गोठ्यातली सेवा गोड
बैलजोडी ती खिल्लारी
नातं समद्यांशी अजोड

झुंजूमंजु गावामंदी
लाट चैतन्याची फिरं
एक गाव रामा पारी
जल्मभरी मनी उरं

दि.०१/०५/२०२४
संध्याकाळी ०७ ११ वा.

## (५९)
## कोरं पान

छान छान असो की
नावडते जगणे मग
आपले आपल्याला
नव्याने कोरे करता यावे जग

पुसता यावे ओरखडे
ओरबाडे मनावरचे
एक खोडरबर आपल्याजवळ
गुपचूप क्षणावरचे

क्षण हवे ते क्षण नको ते
जर का मांडता आले
दुःख सारे साचलेले
मुक्तपणे सांडता आले

मन असं मोकळं करत
दडपणाविना जगता येईल
मनालाच हवं ते
मोकळेपणे मागता येईल

रोज नव्यानं जगण्यासाठी
जीवनाचं रोज कोरं पान
कितीदा नव्याने लिहीत जावे
आयुष्याला आपल्या छान

दि.०२/०४/२०२४
रात्री ११.४९ वा.



## (६०)
## बोकुला छकुला

का ग आई, का ग आई
सांग ना मला काही
सारखे  मी विचारतो
तुला किती प्रश्न बाई

आपण उंदीर का पकडायचे
त्यांच्या मागे किती धावायचे
डोळे  मिटुनच दूध का प्यायचे
उडी मारता पायावरच का यायचे

आपणही खायला
ताट का नाही घेत
पाहुण्यांना आपल्या
हॉटेलात का नाही नेत

नवे नवे कपडे, चपला गॉगल
फिरायला गाडी का ग नसावी
आपल्याही घरात टी व्ही नि मोबाईल
दुधाची डेयरी मस्त असावी


काय बाबा सांगू मी
किती तुझे प्रश्न
सुचतच नाही काही
निरुत्तर प्रश्न

भंडावून सोडतो हा
बोकुला छकुला
डोळे त्याचे खोडकर
सारखेच विचारती काहीतरी मला

कान बघा कसे हो
टवकारलेले
डोळे ते घारुळे
वटारलेले

आता काय बोलू मी
बघतोय कसा
सासराच जाब मला
विचारतो जसा

दि.०३/०५/२०२४
रात्री ११.०१ वा.



## (६१)
## अग अग हरणुली

अग अग हरणुली
किती किती गोडुली
सारे मला म्हणती
तू हरणीच छोटुली


तुझे डोळे किती छान
भिरभिर चंचल
मीही तशी पाहते
म्हणे आई चंचल

कान किती सावध
ऐकती सारे ते
तोंड तुझे नाजूक
किती बरं प्यारे ते

अंगावर ठिपके
पांढुरके छोटेसे
तसा माझा झगाही
वर त्याच्या बुंदकेसे

दोघे आपण मैतर
जवळी तू  ये ना
कित्ती कित्ती गोडू तू
उऽऽऽम्म ... उऽऽऽम्म पापी दे ना

दि.०४/०५/२०२४
रात्री ०८.३२ वा.



## (६२)
## चंद्रम्या तू सांग ना

कोणत्या गावात येशील
चंद्रम्या तू सांग ना
ही उदासी दूर ना रे
चांदण्यासह पांग ना

रोज रातीला असा मी
का झुरावे ना कळे
कोण जी आहे मनातच
जात नाही ना कळे

रोज मी ठरवून देतो
विसरुनी जाईन तिला
खोलवर ती रुजली आहे
सांग कसे सांगू तिला

वाटले होते कधी तू
बोलशील मज भावना
मांडशील आल्हाद देऊन
तिजपुढे माझ्या मना

पण तू वेड्या जाळीशी
माझ्याच नाजूक काळजा
दूरदेशी घेऊनी जा
हृदय मग तू जाळ जा

ती इथे अन तूही येथे
एकटा मी तळमळे
विरह दाहाची तुला मग
सांग दाहकता कळे

पाहता तुज तीच वाटे
का मला ती भेटते
त्या तुझ्या मग चांदण्याने
आग देही लपेटते

म्हणून म्हणतो सांग बाबा
आज तू कोठे कधी
गाव ते सोडून जाईन
असशी तू ती बघ आधी

दि.०५/०५/२०२४
दुपारी १२.४२ वा.



## (६३)
## हृदय हे रंगून जाते

तूही पडला न प्रेमात यांच्या
फुले चिमुकली गोड
रंग एवढे कोण टाकतो
आकारही अजोड

निसर्ग असतो खरा सोबती
सखा आपुला हितकर
मोहक दृश्ये किती साठवून
घ्यावी मनातच सुंदर

स्पर्श कोवळे हरितृणांचे
मल्मल फुलात दडते
मऊशार ही वाटे पालवी
किमया सदैव घडते

असो उदासी अथवा भकासी
क्षणात संपून जाते
नव्या नव्याशा स्वप्नफुलांवर
हृदय हे रंगून जाते

विसरून आपुले आपुलेपण मग
इथे रमावे वाटे
फुले पाकळ्या रंग खुलुनीया
मनी खुशी ही दाटे

दि.०६/०५/२०२४
सकाळी ०९.३७ वा.



## (६४)
## जन्म न वाया जावो माणसा

कुणी शिकवले तुला हे असले
रसग्रहणाचे धडे
फूलपाखरा फुलाभोवती
मधु मधुराचे कडे

कुठे उमलली फुले हासरी
कसे जाणवते तुजला
गोल इवलुसे डोळे तरीही
बाग खुणावते तुजला

फुलाफुलांच्या परागातुनी
मधुघट भरले कुणी
तुला नेमके अमृत तेथे
हे सांगितले कुणी

जीव इवलुसा उदर छोटुले
भूक लहानशी असता
कसे प्राशिसी सांगायाला
कुणीही जवळी नसता

इकडून तिकडे तिकडून इकडे
रस अमूल्य ते भरीशी
उडता उडता सुंदर जगणे
सुंदरतेने करीशी

पंखांवरती चित्र रंगीले
जरी कोरले आहे
वरवरच्या त्या मोहामध्ये
फुलपाखरू अडके न पाहे

काय हो मौलिक घ्यावे झटपट
शिकणे त्याच्याकडुनी
जन्म न वाया जावो माणसा
व्यर्थासाठी अडुनी

दि.०७/०५/२०२४
सकाळी ०८.२६ वा.



## (६५)
## काय दिवस होते भारावलेले

सारवण शेणाचं तुझं
अंगणी चालायचं
कधी सडा पडायचा
कधी लिंपण घराचं व्हायचं

तू लक्षुमी घराची
घरावरून तुझा हात फिरायचा
सुगंध मातीचा हुंगून
आसमंतात तो किती उरायचा

संपदा प्रेमाने नित्य
गोधनाची गोठ्यात वसे
आला गेला पै पाहुणा
सुखाने तृप्त होतसे

घराची कळा अंगण सांगते
म्हणत असत पूर्वज सगळे
तू अंगणाला तुझ्या प्रेमाने
बनवत असशी देखणे नि आगळे

इथेच कितीतरी दुःख
बरे झाले भुई लोण लावून
इथेच मनाच्या वेदना
संपून गेल्या मनमोकळ्या गप्पांतून

हे शेणाचे सडे, हे सारवण
हे लिंपण चुलीचं, भिंतींचं लेपण
काय दिवस होते भारावलेले
खेड्यातले आपुलकीचे ते पण

दि.०८/०५/२०२४
सकाळी ०७.४७ वा.



## (६६)
## नवीन प्राण हे फुंकावे

घेऊन जा रे तिथे मला तू
उमलून येईल मन
सृष्टी संगे हिरवाईच्या
बनात राहील मन

घर कौलारू साधे असू दे
तुझ्या नि माझ्या स्वप्नीचे
भवताली मग स्वर्ग अवतरे
नंदनवन जणू पृथ्वीचे

रोजरोजची फुले हासरी
रंगामध्ये माखून ती
मला खुणावती न्याहाळ न्याहाळती
हळूच पाहती वाकून ती

पायाखाली हिरवाईची
माया मल्मली अंथरली
तुझी नि माझी प्रीत आगळी
इथेच राजा मंतरली

वरून वाकले डोक्यावरती
सुंदर छत आकाशाचे
डॉगर सारे हिरव्या दुलयीत
रस्ते हळव्या प्रकाशाचे

रोज वाटते नवीन जगणे
नवीन प्राण हे फुंकावे
ओंजळ देते प्रीत फुलांची
हरखून त्यांना हुंगावे

दि. ०९/०५/२०२४
सकाळी ०८.४६ वा.




## (६७)
## अक्षय माझे कर्म ठरू दे

अक्षय माझी शब्दसंपदा
अक्षय त्यातील भाव राहू दे
अक्षय वाणी सहजी प्रसृत
अक्षय माधुरी त्यात वाहू दे

अक्षय माया अक्षय प्रीती
अक्षय असू दे लोभस नाती
अक्षय नंदादीपामधली
तेवत राहो प्रकाश ज्योती

अक्षय इथल्या भाव भावना
अक्षय आणिक हळव्या कामना
अक्षय ऋजुता बंध कोवळे
अक्षय सालस ठेव या मना

अक्षय सेवा तुझी साधना
अक्षय असू दे आराधना
अक्षय सर्जन अक्षय अर्जन
अक्षय तृप्ती असो मन्मना

अक्षय मधुरस अन्नकणांचे
अक्षय नवरस साहित्याचे
अक्षय लाभो रसिकवरांचे
अक्षय आशीष मान्यवरांचे

अक्षय मजला कृपा तुझी अन्
अक्षय शिरी ह्या कर तू ठेवून
अक्षय माझे कर्म ठरू दे
अक्षय अक्षरसेवा होऊन

दि.१०/०५/२०२४
सकाळी ०८.०५ वा.
अक्षयतृतीया शुभकामना



## (६८)
## पाठवली तू हळवी बकुळी

पाठवली तू हळवी बकुळी
तिची पाकळी खुललेली
कळी कोवळी दडते पानी
कुणावरी ती भुललेली

तिला न माहीत गंध गोडवा
आत केवढी नाजुक ती
उंच उमलते झाडावरती
राधा जणू की भावुक ती

वाट पाहते लपूनछपून का
कोण तिच्या मनी दडलेला
कळले तेंव्हा स्वीकाराचा
रम्य सोहळा घडलेला


तरी अबोल ती गप्प राहते
कुणा न बोले मनातले
ऐकत राहते साहत जाते
बोल बोचरे जनातले

तिच्या मनीचे सख्यास माहीत
सख्या गुपिता जाणे ती
दोघांमधल्या लघववेळा
रम्य सांजेच्या खाणेती

मदन पाहतो देखदेखणे
कुठून प्रीतीचे चोर मळे
किती लपविता सुगंध सांगे
जगतालाही मग ते कळे

लाजलाजते नव्यानव्याने
खुलत राहते तिची खळी
तोही जपतो हृदय दालनी
तिची बावळी ती पाकळी

दि.११/०५/२०२४
दुपारी ०२.३७ वा.




## (६९)
## अस्तित्वाचं असणं

कुठली अनोळखी झाडं
त्यातून अनोळखी मायेची किरणं
कधी घरात उपेक्षा मिळते ना
तेंव्हा बाहेर आपुलकीच्या शोधात फिरणं

अनोळखी मग मुळं
अनोळखीच्याच फांद्या
पानापानांच्या सळसळीत
गवसतील का जिव्हाळ्याच्या बंध बांध्या

हवी हवीशी गारव्याची झुळूक
मिळेल का कायम
की थोड्याच वेळाची बोळवण
एक रिकामी पोकळी कायम

अनाम जाणवते पायाशी मऊपण
कुठल्या तरी विस्मृतीतल्या पुण्यासारखे
इतके सगळे भरलेले असूनही
जग मनातले शून्यासारखे

परत करावे लागतात जणू
ते क्षण, ते कण ते सारच उसणं
उत्तर सापडत नाही तेव्हा वाटतं
व्यर्थच आहे का हे अस्तित्वाचं असणं

दि.१२/०५/२०२४
रात्री ०८.३२ वा.



## (७०)
## वेळा चुकल्या ऋतूंच्या

धरा तापली तापली
भुई कासावीस झाली
त्यात वैशाख वणवा
रणरण ऊन्हं व्याली

आग ओकतो रोजच
वर सुर्व्या बसून
मग वाटते उगाच
पाहतो का तो हसून

करा नुकसान तुम्ही
आम्ही रौद्र रूप दावू
माय बाप निसर्गाचा
नका दुखावून देऊ

नाईलाज आमुचाही
राग कसा तो करावा
आपणच निर्मीयले
त्याचा काळ का ठरावा

वेळा चुकल्या ऋतूंच्या
घ्यावा शिडकावा थोडा
कुठे शीतल गारवा
कुठे अवकाळी खोडा

आता तरी सुधरावे
जरा नव्याने पहावे
भाव हळवे जरासे
आम्हासाठी ही ठेवावे

दि.१३/०५/२०२४
रात्री ११.५६ वा.

# लेखिकेचा परिचय


- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५

  ई-मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४


**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा:** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

''**साहित्यिक व्रत**'' म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील 'हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक 'विवाह संस्कार' २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर 'प्राचीन भारतीय समाज', 'सूर्य शक्ती और मानव', 'कौटिलीय अर्थशास्त्र', 'स्मृतीग्रंथ – भाग १ और २' ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

  त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा – नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी

अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), मृद्गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी-जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड-गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग-निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा, सृष्टीगंध, युगंधरा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक), रूप-स्वरूप, श्रीरंग (राधाकृष्ण), अलवार, मधुश्री, सहा सोहळे (ऋतू), सुधांशु (चंद्र), दिव्यांतरी (सूर्य), बकुळफुले, अळुमाळु, सुरभी, कामिनी (फुलांवरील कविता), खाणाखुणा (पशु), वैष्णवी (पक्षी), नादश्रुती, श्वेता (तिच्यावरील प्रीत कविता), स्वामिनी (स्त्रीजीवन - भाग १), मृणालिनी (स्त्रीजीवन - भाग २), प्रमिला (धरती-आकाश), लाघव वेळा (सकाळ-संध्याकाळ), मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती (जीवनपर कविता), प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर (त्याच्यावरील प्रीत कविता), मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी (ललितलेख), बोल बरवे, मनस्विनी, हृदयस्पर्शी (रसिक प्रतिक्रिया - कवीश्वर), प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (अन्य रसिक प्रतिक्रिया), गंधराणी (मिश्र कविता), श्रावणी (पाऊस कविता), उल्का (गझल), तेंव्हा (वेळा), नभ मोजताना (धरती-आकाश), जरा रेंगाळले (वाट), रंगतनु, कृष्णकांत (रंग), कविता माझी (सर्वोत्कृष्ट कविता), कवडसा, मृण्मयी (मिश्र कविता) यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग-१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात - डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये 'मंजु मंजिरी' आणि 'सर्ग निसर्ग' नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके -**

(मिश्र कविता) - अबोली, अनावर मना, मल्मली, अक्षरा, अनुरंग, नवीनवेली, मन ओथंबून गेले, उमलवाट, दरवळ तुझे नि माझे, लोभसवाणी, (मन) मनमनुल्या, वेध मनाचा, शब्द पाखरा, मन मोहरून माझे, (अध्यात्म)

– निरव नमन, (जीवनपर) – क्षणांचं देण, आयुष्याचं गाव, (फुल) – फुललेलं मौन, (निसर्ग) – सुख सुखाचं, पानापानातली कथा, (प्रीत त्याची तिच्यासाठी) – स्पंदन रेषा, (सुख–दुःख) – सुखाचा किनारा, (नानी) – थांब जरा तू, (गंध–सुगंध) – दूर त्या तिथे, आनंद गंधपाणी, (स्त्री जीवन) उडण्या हे आभाळ, संस्कृत बालगीत संग्रह – बालमोदिनी, सुधा मूर्ती यांच्या 'तीन हजार टाके' या मराठी पुस्तकाचा संस्कृत अनुवाद – त्रिसहस्रसीवनम्, सुधीर शास्त्री यांचा मराठी काव्य संग्रह 'मनुष्य' या पुस्तकाचा संस्कृत अनुवाद – मनुषः, शब्द तुझ्या नावाचे, घडते नवेच काही.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२–२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१

- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल-साहित्य पुरस्कार २०२९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८
- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री मुलाखत, दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialshare buttons |
| ३ | ''आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे.'' साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/maha_governor/status/ @maha_governor 1439559856764030979 ?s=08 <https://twitter.com/maha_governor/status/1439559859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान 'प्रकाशवाटा' या डॉ. प्रकाश आमटे यांच्या आत्मचरित्राचा संस्कृत अनुवाद डॉ. कुलकर्णी यांनी 'प्रकाशमार्गा:' | https://www.loksatta.com //lokrang/sahitya-akademi-award-for-translation-autobiography-of-prakash-amte-poet-prof-dr-manjusha-kulkarni-prakashwata-zws-70-2612674/lite/ ?utm_source=whatsapp_web&utm_medium=social&utm_campaign=socialsharebuttons |
| ७ | https://mr.wikipedia.org | https://mr.wikipedia.org/wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी यांचा महाराष्ट्र राज्याच्या मा. राज्यपालांच्या हस्ते अभिनव साहित्यिक विक्रम केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/<br>7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com<br>MahaGovtMic/status<br>1476551366352924<br>672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/<br>InfoVidarbha/status/<br>1418559733921816<br>580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर<br>डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>सखी सह्याद्री - डीडी<br>सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/<br>VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/IT<br>LxInwuJc ; https:/<br>youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह<br>डॉ.मंजूषा कुलकर्णी /<br>नवरात्री स्पेशल /<br>सकाळ मीडिया | https://youtu.be/<br>m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=126653335052919 8id=100015176343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=4429100480484776 id=100001546044035 sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम – ''सर्ग_निसर्ग'' ऑडिओ अल्बम – ''मंजुमंजिरी'' | <https://vy6s8.app.goo.gl/NKnJ> https://vy6s8.app.goo.gl/A8Z5 |
| १८ | Special Screening of 100th Episode of Mann Ki Baat from Raj Bhavan | https://www.youtube.com/live/7-dyWQaLA?si=mid7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग – १ | https://youtu.be/TrNMBV_ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग –२ | https://youtu.be/NpvMk-Pu4dOs?si=typfHtOvNg-1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : १०१
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : ३१
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

• • •